# आयुक्त, कुटुंब कल्याण व
# संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२२ - २२६२००६६ /६५<br>०२२ - २२६२ ४५००<br>फॅक्स - ०२२ २२६२२६५५<br>E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला,<br>सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,<br>पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,<br>फोर्ट, मुंबई ४०० ००१. |


राग्रासो /EMS /रेफ.ट्रान्सपोर्ट/२०११.
दि. २०.१२.२०११. / [illegible]

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय,
स्त्री रुग्णालये,
(३४ जिल्हे प्रपत्रक 'अ' प्रमाणे)

विषय :- JSSK कार्यक्रमा अंतर्गत परतीच्या प्रवासासाठी (DROP BACK) वाहने.

संदर्भ :- १) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिमान कार्यक्रमा अंतर्गत Referral Transport कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचना.
२) आरोग्य भवन, मुंबई येथे जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांची दि. २१ ते २५ नोव्हेंबर,२०११ या कालावधीतील बैठकीतील निर्णय.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रेफरल ट्रान्सपोर्ट हा कार्यक्रम जिल्हा स्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबविला जातो या कार्यक्रमातंर्गत :- पुढीलप्रमाणे विनामुल्य संदर्भ वाहतुक सेवा पुरविण्यात येते.

१) प्रसुतीपुर्व वेदनेच्या काळात व प्रसुतीसाठी निवासस्थानापासुन रुग्णालयात जाण्यासाठी व प्रसुती झाल्यानंतर मातेला नवजात बालकासह निवासस्थानी परत पोहोचविण्यासाठी.

२) ० ते ३० दिवस या वयोगटातील आजारी बालकास व त्याच्या मातेस निवासस्थातुन रुग्णालयात व रुग्णालयातून निवासस्थानी परत पोहोचविण्यासाठी.

३) रेफरल ट्रान्सपोर्ट या योजनेअंतर्गत मोफत वाहन सेवा पुरविण्याची योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.या योजनेतंर्गत प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात २४ तास कार्यरत असणारा संपर्क कक्ष तयार करण्यात आला असुन या संपर्क कक्षात १०२ हा टोल फ्री क्र. बसविण्यात आलेला आहे. याठिकाणी पाळी पध्दतीवर ५ प्रशिक्षित कर्मचारी नेमण्यात आली आहेत, नागरिकांनी १०२ या टोल फ्री क्रमांकावर दुरध्वनी करुन निवासी पत्ता व रुग्णाबद्दलची माहिती दिल्यानंतर रुग्णांच्या निवासस्थानी मोफत रुग्णवाहिका पाठविण्यात येते व प्रसुतीसाठी जाणाऱ्या मातेसाठी किंवा बालकासाठी विनामोबदला रुग्णवाहीका सेवा दिली जाते. त्याचप्रमाणे रुग्ण परत जातेवळी उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे परतीची वाहतुक व्यवस्था देखील केली जाते. सदर योजना कार्यान्वीत करण्यासाठी उपलब्ध शासकिय रुग्णवाहीका वापरल्या

असलेल्या व आपत्कालिन रुग्णवाहिका व्यतिरिक्त आवश्यकता व भाड्याने तालुका स्तरावर Empanel केलेल्या खाजगी रुग्णवाहिका Call basis वर घेणे तत्वावर करून पुरवठा करणे अपेक्षित आहे. खाजगी रुग्णवाहिका सेवेचे उपलब्ध होण्यासाठी जिल्हा पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व अन्य अधिकाऱ्यांची एक समिती गठित करण्यात आली असून या समितीच्या माध्यमातून पॅनेलवरील रुग्णवाहिकांचे panel तयार करणे व त्यांचे दर ठरविणे, याबाबतची कार्यवाही केली जात आहे. यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कृती आराखड्याच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत. तथापि अशा खाजगी रुग्णवाहिकांचे panel तयार करण्यामध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अडचणी येत आहेत. याबद्दल उपरोक्त संदर्भ क्र २ नुसार झालेल्या बैठकीमध्ये रुग्णास परत घरी सोडण्यासाठी (DROP BACK) रुग्णवाहिका देण्याची साधारणपणे आवश्यकता नसते, सबब परतीच्या प्रवासासाठी नेहमीचे साधे वाहन उपलब्ध करुन दिल्यास चालू शकते, असे मत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

४) वर उल्लेख केलेल्या अडचणींचा विचार करुन जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत ज्याठिकाणी रुग्णांना परत घरी सोडण्यासाठी (DROP BACK) प्रसूतीची संख्या जास्त आहे अशा रुग्णालयांसाठी साधी परवानाधारक प्रवासी वाहने मासिक भाडे तत्वावर घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. सोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्यातील निवडक ४७ ठिकाणी असणाऱ्या जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालय या ठिकाणी प्रसूतीची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने रुग्णांना घरी पोहोचविण्यासाठी प्रपत्रातील शेवटच्या कॉलम मध्ये दर्शविलेल्या संख्येनुसार वाहने फक्त रुग्णांच्या परतीच्या प्रवासाकरिता (DROP BACK) भाड्याने घेण्यासाठी एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

५) JSSK योजने अंतर्गत रुग्णाला DROP BACK साठी त्वरीत वाहने आवश्यक असल्याने शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात ज्या दराने वाहने भाड्याने घेण्यात आलेली आहेत त्याच दराने प्रस्तुत कार्यक्रमासाठी वाहने भाड्याने घ्यावीत. तथापि जिल्हा शल्य चिकित्सकांनी JSSK च्या DROP BACK साठीची वाहने मासिक भाडेतत्वावर घेण्याचे दर विहित प्रक्रिया पार पाडून दि. ३१ मार्च, २०१३ पर्यंत निश्चित करावेत व त्या नवीन दराने त्यापुढे वाहने घेण्यात यावीत.

६) भाड्याने घ्यावयाचे वाहन हे सुस्थितीत असावे व ते ५ वर्षांपेक्षा जुने नसावे. त्याचप्रमाणे या वाहन धारकाकडे प्रवासी वाहतुकीचा परवाना असावा व वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना (Driving License) असावा.

७) वाहनामध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांची बसण्याची सोय आरामदायी असावी व ते यांत्रिकदृष्ट्या सक्षम असल्याची खात्री करावी.

८) वाहन मालकाकडे प्रवासी वाहतुकीचा परवाना असावा. वाहनास वैध फिटनेस प्रमाणपत्र, कर भरल्याचा पुरावा व विमा प्रमाणपत्र असावे.

९) मासिक भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांची देयके धनादेशाद्वारे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी JSSK अंतर्गत Referral Transport साठी प्राप्त होणाऱ्या निधीतून करावीत.

१०) सदर वाहने भाड्याने घेतल्याचा तपशील अहवालासह दर पुढील महिन्याच्या ५ तारखेच्या आत कार्यालयात सादर करावा.

आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक,
राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,
महाराष्ट्र, मुंबई.

NRHM CELL
ISSUED
Date: 22/12/11

सोबत : प्रपत्र 'अ'

प्रत सविनय सादर :

१) मा. अपर मुख्य सचिव, आरोग्य विभाग,मंत्रालय.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१) सर्व नियंत्रक अधिकारी, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य,मुंबई.
२) अतिरिक्त संचालक, कु.क, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य सेवा, पुणे.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (३३ जिल्हे)
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (३३ जिल्हे)
५) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, त्यांना सुचना देण्यात येतात कि, या परिपत्रकाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल दि. ३१/१२/२०११ पूर्वी या कार्यालयास सादर करावा. (३५ जिल्हे)